मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महायुतीमध्ये 'उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग'

## महायुतीच्या दूधात मिठाचा खडा : राज्यातील प्रदेश नेत्यांच्या सूचनेनंतरही इच्छुकांची अतिघाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीचा निकाल लागला तसा पिंपरी-चिंचवडमधील इच्छुकांनी विधानसभेची मोर्चेबांधणी सुरू केली. राज्यात लोकसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्ला असला, तरी सध्यस्थितीला महायुतीमध्ये 'आमदारकी'साठी इच्छुकची संख्या मोठी आहे. त्यामुळे "मी लढणारच... " अशा भूमिकेत इच्छुक असून, महायुतीच्या 'दूधात मिठाचा खडा' पडण्याची चिन्हे आहेत.



नुकतच्या झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे देशभरात स्वबळावर २४० जागा मिळवल्या आहेत. मात्र, राज्यातील बदललेली राजकीय परिस्थिती आणि महाविकास आघाडीला मिळालेली सहानुभूती यामुळे महायुती 'बॅकफूट' वर राहिली, हे सर्वश्रूत आहे.

आगामी विधानसभा निवडणुका सप्टेंबर- ऑक्टोबर २०२४ मध्ये होणार हे जवळपास निश्चित आहे. त्यामुळे महायुती व महाविकास आघाडीतील इच्छुकांमध्ये चढाओढ सुरू झाली आहे. पिंपरी-चिंचवडमधील चिंचवड आणि भोसरी मतदार संघामध्ये भारतीय जनता पार्टीच्या तिकीटावर अनुक्रमे अश्विनी जगताप (पोटनिवडणूक) आणि महेश लांडगे विद्यमान आमदार आहेत. पिंपरी मतदार संघामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अण्णा बनसोडे आमदार आहेत. त्यामुळे शहरातील तीनही मतदार संघामध्ये महायुतीची सत्ता आहे.

"राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला सोबत घेतल्यामुळे जनमानसांमध्ये भाजपाची प्रतिमा मलीन झाली" राज्यातील लोकांना हा राजकीय बदल आवडला नाही.." असा सूर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ज्येष्ठांनी घेतला. भाजपाचे काही ज्येष्ठ नेत्यांचाही हाच सूर आहे. तसेच, अजित पवार गट आणि शिंदे गटाला मंत्रीपद मिळाले नाही. यावरुनही नाराजीनामा सुरू आहे.

परिणामी, महायुतीमधील वातावरण गढूळ होत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या भाषणात "आगामी विधानसभा निवडणुकीत जागा वाटपावरुन कोणही चर्चा किंवा मीडियाला बाईट देवू नका..." महायुतीमधील वातावरण तणावपूर्ण होणार नाही याची काळजी घ्या" अशा सूचना दिल्या आहेत. असे असतानाही पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी भोसरीमधून, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे आणि माजी नगरसेविका माया बारणे यांनी चिंचवडमधून निवडणुकीसाठी दंड थोपाटले आहेत.

वास्तविक, लोकसभा मतदार झाले आणि त्यानंतर लगेचच राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आपले काम केले नाही. काही लोकांनी छुप्या पद्धतीने महाविकास आघाडीचा प्रचार केला, असा गंभीर आरोप जाहीरपणे खासदार श्रीरंग बारणे यांनी केला होता. तत्पूर्वी, आमदार अण्णा बनसोडे, आमदार सुनील शेळके यांनी बारणे यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. त्याचाही वचपा बारणे अजित पवार गटावर काढण्याची संधी सोडणार नाहीत, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पोलीस पुत्राचा 'कार'नामा

## रस्ता ओलांडणाऱ्या महिलेला कारने उडवले : चोवीस तासानंतर पोलीस पुत्रावर गुन्हा दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवडमध्ये पोलीस पुत्राने भरधाव कारने रस्ता ओलांडणाऱ्या महिलेला जोरात धडक दिली आहे. यामध्ये महिला गंभीर जखमी झाली आहे. ही घटना बुधवारी (दि. १२) दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. दरम्यान, अपघाताचे सीसीटीव्ही फुटेज समाजमाध्यमांवर व्हायरल झाले. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या पोलिसांनी चालक असलेल्या पोलिस पुत्रावर गुन्हा दाखल केला आहे.



रेखा जिवाराम चौधरी (वय ४०, रा. बोऱ्हाडेवाडी, मोशी) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी त्यांचे पती जिवाराम चौधरी (वय ४४, रा. बोऱ्हाडेवाडी, मोशी), यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, विनय विलास नाईकरे (वय २३, रा. प्रेस्टीन ग्रीन सोसायटी, मोशी) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पोलीस पुत्र असल्याने उलटसुलट चर्चा**

» कारचालक असलेल्या आरोपीचे वडील विलास नाईकरे, हे पोलीस दलात नोकरीला असून सध्या एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात त्यांची नियुक्ती आहे. दरम्यान, अपघातानंतर २४ तास उलटूनही पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. त्यामुळे उलट सुलट चर्चेला उधाण आले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या पत्नी रेखा आणि मुलगी बुधवारी दुपारी स्वराज रेसिडेन्सी समोर रस्ता ओलांडत होत्या. त्यावेळी आरोपी चालवत असलेल्या भरधाव कारने रेखा यांना धडक दिली. ज्यामुळे त्या काही फूट उंचावर उडून रस्त्यावर आपटल्या. नागरिकांनी तात्काळ त्यांना नजीकच्या रुग्णालयात दाखल केले. रेखा याच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली असून कंबरेचे हाड मोडले आहे. अपघातानंतर विनय नाईकरे याने जखमी महिलेला दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर थोडावेळ थांबून तो निघून गेला होता. तपास एमआयडीसी भोसरी पोलिस करत आहेत.

# वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसह सर्व काळजी सरकारची

## उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पालखी सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी आढावा बैठक संपन्न

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी पालखी सोहळ्यादरम्यान पंढरपूर, पालखी मार्ग, पालखी तळ आदी ठिकाणी पाणी, वीज, आरोग्य आणि स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. सोहळ्यासाठी शासनातर्फे आवश्यक निधी देण्यात येईल अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.



विधान भवन पुणे येथे झालेल्या श्री क्षेत्र देहू व श्री क्षेत्र आळंदी पालखी सोहळा-२०२४ पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस आमदार दिलीप मोहिते पाटील, संजय जगताप, दत्तात्रय भरणे, समाधान आवताडे, बबनदादा शिंदे,संजय शिंदे, सुनील कांबळे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल, पुणे आणि सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आदी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, पालखी सोहळ्यासाठी फिरते शौचालय आणि टँकरची पुरेशी व्यवस्था करण्यात यावी. शौचालयाच्या स्वच्छतेवर विशेष लक्ष द्यावे. राज्य शासनाकडून पालखी सोहळ्यासाठी आवश्यक कामासाठी उपलब्ध करून देण्यात येणारा निधी प्राप्त होईपर्यंत जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून खर्च करावा.

इंद्रायणी नदी स्वच्छतेचे काम तातडीने करण्यात यावे. पालखी सोहळा झाल्यानंतर पंढरपूर शहरात स्वच्छतेसाठी आवश्यक नियोजन करण्यात यावे. मानाच्या पालख्यांसह इतर पालख्यांसाठी रात्रीच्या वेळी विद्युत व्यवस्था करण्यात यावी. पालखी मार्गाला लागून असलेल्या जागा सोहळ्याच्यादृष्टीने कायमस्वरूपी ताब्यात घेऊन त्याचा पालखी सोहळा वगळता इतर वेळी अन्य उपयोग करण्याबाबत प्रस्ताव तयार करावा. अशा जागांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. पालखी मार्गावरील कायमस्वरुपी सुविधेच्यादृष्टेने विभागीय आयुक्तांकडे बैठकीचे आयोजन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

पालखी सोहळ्याच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सूचनांची अधिकाऱ्यांनी नोंद घेऊन आवश्यक कार्यवाही करावी. पालखी सोहळा चांगल्यारितीने संपन्न व्हावा यासाठी शासन-प्रशासनातर्फे आवश्यक सर्व सहकार्य करण्यात येईल. शासनाचे सर्व विभाग सकारात्मक राहून सोहळा यशस्वी करण्यासाठी काम करतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

अन्य जिल्ह्यातून येणाऱ्या पालखी सोहळ्यासाठी सुरक्षा आणि अन्य व्यवस्था देण्याबाबत राज्य स्तरावरून सूचना देण्यात येतील. वारी दरम्यान दुर्घटना घडल्यास शासनातर्फे आर्थिक सहकार्य करण्यात येईल, असेही अजित पवार यांनी सांगितले.

### पुणे जिल्ह्यात तयारी अंतिम टप्प्यात

» जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी पुणे जिल्ह्यात केलेल्या पूर्वतायरीची माहिती दिली. पालखी सोहळ्यासाठी ३ हजारपेक्षा अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जेजुरी पालखी तळाची कामे सुरू करण्यात आली आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी १ हजार ८००, श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी १ हजार २०० आणि संत सोपान महाराज पालखी सोहळ्यासाठी २५० शौचालयांची सुविधा करण्यात येणार आहे. आषाढी वारीसाठी २०० पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली असून ४५ ठिकाणी पाणी भरण्याची सुविधा असणार आहे. ११२ वैद्यकीय अधिकारी आणि ३३६ कर्मचाऱ्यांची आरोग्यसेवेसाठी पालखी मार्गावर नियुक्ती करण्यात आली आहे. ११५ आरोग्य पथके, ५७ फिरते वैद्यकीय पथक आणि १७९ रुग्णवाहिकेद्वारे आरोग्य सुविधा करण्यात येणार आहे. १२ ठिकाणी हिरकणी कक्ष उभारण्यात येईल. अन्न व औषध प्रशासनातर्फे खाद्य आणि पेय पदार्थांची तपासणी करण्यात येणार आहे. मोबाईल टॉवरची नेटवर्क फ्रिक्वेंसी वाढविण्यात येणार आहे. पालखी मार्गावर असलेल्या शासकीय आणि खाजगी रुग्णालयातील १० टक्के खाटा आरक्षित ठेवण्यात येणार आहेत. जिल्हा परिषद, पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे आवश्यक नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# गुंड गज्या मारणेकडून खासदार निलेश लंकेंचा सत्कार

## निलेश लंके राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार : राजकीय वर्तुळात खळबळ

**पुणे | प्रतिनिधी**

कोथरूड भागातील गुंड गजानन उर्फ गज्या मारणे याने नगरमधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शरद पवार गटाचे खासदार निलेश लंके यांचा सत्कार केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. लंके यांच्या सत्कार समारंभाची चित्रफीत समाजमाध्यमातून प्रसारित झाल्यानंतर मारणे पुन्हा चर्चेत आला आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ यांनी मारणेची भेट घेतल्याची चित्रफीत प्रसारित झाली होती.



मारणे याची कोथरूड भागात दहशत आहे. खून, खुनाचा प्रयत्न, खंडणीसह अनेक गंभीर गुन्हे त्याच्याविरुद्ध दाखल आहेत. मारणे याने खासदार लंके यांचा सत्कार केल्याची चित्रफीत प्रसारित झाली. चित्रफीत प्रसारित झाल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी फेब्रुवारी महिन्यात पोलीस आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारली. त्यानंतर त्यांनी गज्या मारणे, निलेश घायवळ, सचिन पोटे, बाबा बोडके टोळीसह शहरातील वेगवेगळ्या भागात दहशत असलेल्या गुंडांना पोलीस आयुक्तालयात बोलावून त्यांना समज दिली. गंभीर गुन्हे केल्यास कठोर कारवाईचा इशारा पोलीस आयुक्तांनी दिला, तसेच दहशत निर्माण करण्यासाठी समाजमाध्यमात चित्रफीत प्रसारित केल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला होता.

पोलीस आयुक्तालयात गुंड गज्या मारणेला बोलावून गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांनी दम भरला. त्यानंतर गज्या मारणे, निलेश घायवळसह शहरातील वेगवेगळ्या भागात दहशत असलेल्या टोळ्यांकडून समाजमाध्यमात चित्रफीत प्रसारित करण्यात येत असल्याचे दिसून आले आहे.

### घायवळचे नगर कनेक्शन आणि मारणेची चाल

» एकेकाळी गज्या मारणे याचा निकटचा साथीदार अशी ओळख निलेश घायवळ याची होती. कोथरुड भागात दोघांचा दबादबा आणि दहशत होती. मारणे आणि घायवळ यांच्यात वर्चस्व, आर्थिक व्यवहारातून खटके उडू लागले. मारणे आणि घायवळ टोळ्यांमध्ये वैमनस्य निर्माण झाले आणि टोळीयुद्धाचा भडका उडाला. टोळीयुद्धातून घायवळवर हल्ला झाला, तसेच त्याच्या साथीदारांचे खून झाले. घायवळने मारणे टोळीवर सूड घेण्यासाठी त्याच्या सचिन कुडलेवर दांडेकर पूल गोळीबार करून त्याचा खून केला. घायवळ मूळचा नगर जिल्ह्यातील जामखेडमधील आहे. गेल्या काही वर्षांपासून घायवळने कर्जत, जामखेड परिसरात दबदबा निर्माण केला आहे. घायवळला शह देण्यासाठी मारणे खासदार निलेश लंकेंचा सत्कार करून वेगळी चाल खेळली, अशी चर्चा गुन्हेगारी वर्तुळात सुरू झाली आहे.

# यंदा पालकांच्या खिशाला झळ!

## नवीन शैक्षणिक वर्षाला आजपासून सुरुवात, शैक्षणिक साहित्याच्या किमतीत वीस टक्क्यांपर्यंत वाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक वर्षाला शनिवारपासून सुरुवात होणार असल्याने शालेय साहित्यांनी बाजारपेठ गजबजली आहे. यंदा साहित्य खरेदी केले जाणार असल्याने बाजारात गर्दी आहे. दरम्यान यंदा सर्व प्रकारच्या साहित्याच्या किमतीत सरासरी वीस टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. त्यामुळे पालकांच्या खिशाला झळ बसत आहे.

पिंपरी कँम्प या स्थानिक बाजारपेठेत शालेय साहित्याचे विक्रेते आहेत. गेल्यावर्षी दीडशे रुपये डझन असणाऱ्या वह्या आता दोनशे रुपयांवर गेल्या आहेत. तसेच पाच रुपयांना मिळणारा साधा पेन आता सात रुपयांना मिळत आहे तर दोनशे रुपयांचे दप्तर देखील २६० रुपयांना झाले आहे. शुक्रवारी बाजारात साहित्य खरेदीसाठी गर्दी दिसून आली. इंधनाचे वाढलेले दर, कागद टंचाई याचा शालेय साहित्य दरवाढीवर परिणाम झाला आहे. पेन्सिलपासून लाँगबुकपर्यंत सर्वच साहित्याच्या किमती वाढल्याने पालकांचे शैक्षणिक बजेट कोलमडले आहे. ज्या पालकांना दोन किंवा त्यापेक्षा अधिक मुले आहेत, त्यांचा या वर्षीचा खर्च वाढणार आहे.

तीन रुपयाची साधी पेन्सिल पात ते सात रुपयांना तर दहा रुपयांचे पेन १५ रुपयांवर पोहचले आहे. वह्यांच्या किमती डझनामागे ६० ते १०० रुपयांनी वाढल्या आहे. नामांकित कंपन्यांच्या वह्यांच्या दरात वीस टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. लहान वह्यांच्या किमतीत डझनला ६० रुपयांची वाढ झाली आहे. याशिवाय कंपास आणि कंपास साहित्य १५ टक्क्यांनी तर विद्यार्थ्यांच्या दप्तरचे भाव १५ टक्क्यांनी वाढले आहेत. स्कूल बँग व टिफिनचे शेकडो प्रकार दुकानात उपलब्ध असल्याने त्यांची खरेदीही वाढली आहे. महागाईची झळ आता शाळेपर्यंत पोहोचली असली तरीही शैक्षणिक साहित्य गरजेचे असल्याने पालकांना ते खरेदी करावेच लागत असल्याचे पालक योगेश पाटील यांनी सांगितले. यामुळे पालकांना यंदा साहित्य खरेदी करताना महागाईची झळ सोसावी लागत आहे.

कोरोना काळात शाळा, महाविद्यालये ऑनलाईन सुरू होती. त्यामुळे शैक्षणिक साहित्याच्या विक्रीत काही प्रमाणात घट झाली. परंतु मागील वर्षापासून शाळा पूर्ववत सुरू झाल्याने वह्या, पुस्तके, दप्तर, रेनकोट यांच्या खरेदीसाठी आता पालक स्टेशनरी दुकानात जात आहेत. पंरतु येत्या नव्या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक साहित्याचे वाढलेले दर पाहून पालकांना आश्चर्याचा धक्का बसणार आहे.



### कागद, शाईसह वाहतूक महागल्याने भाववाढ

» जगभरात कागद, शाई, स्टीलचे भाव वाढले आहेत. याचा परिणाम शालेय साहित्यावर पडला असून वह्या, नवनीतसह इतर कंपन्यांचे प्रिंटेड स्टेशनरी यांचे भाव २५ ते ३० टक्क्यांनी महागले आहे. वाहतूक खर्च, पेपरच्या वाढलेल्या किमतीमुळे शैक्षणिक साहित्य महागले आहे, असे विक्रेता विनय सिंग यांनी सांगितले.

### असे आहेत साहित्याचे दर

- वह्या ः १५० ते ३०० रुपये डझन
- ए ४ (१५० पानी) ः ७५ ते ८५
- २०० पानी ः ८५ ते १००
- १०० पानी ः ३० ते ४५
- स्कूल बॅग ः ३५० ते १००० रुपयांपासून पुढे
- पेन ः १२ ते १५ रुपये
- वॉटर बॅग ः १०० ते ३३०
- कंपास पेटी ः १०० ते ३५०
- टिफिन बॉक्स ः १०० ते २५०
- रेनकोट ः २०० ते ५५०
- पेपर रिम ः २२०

# अनधिकृत होर्डिंगवर प्राधिकरणामार्फत कारवाईला सुरवात

## खासगी ठेकेदाराला होर्डिंग कारवाईबाबत कार्यालयाने आदेश दिले, कारवाईला वेग येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) अनधिकृत होर्डिंगवरील कारवाईला सुरवात होणार आहे. प्राधिकरणाकडून स्थापन केलेल्या स्वतंत्र आकाश चिन्ह विभागाच्यावतीने यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. कारवाईबाबतची निविदा उघडली आहे. पुढच्या आठवड्यापासून या कारवाईला वेग येणार आहे.

'पीएमआरडीए'च्या ९ तालुक्यात हजारो अनधिकृत होर्डिंग उभारण्यात आलेली आहेत. प्राधिकरणाने काही दिवसांपूर्वी या सर्व तालुक्यात सर्वेक्षण पूर्ण केले. त्यानुसार पहिल्या टप्प्यात १ हजारांच्या आसपास अनधिकृत होर्डिंग, जाहिरात फलक, बोर्ड याची माहिती गोळा केली आहे. त्याबाबत संबंधितांना नोटीस आणि मंजुरीबाबत अर्ज करण्याचे आवाहन केले होते. दरम्यानच्या काळात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने होर्डिंग विषयावर पुढील कार्यवाही होऊ शकली नाही. त्यातच कारवाई संदर्भात निविदा उघडण्यात येत नव्हती. प्राधिकरणाने जिल्हाधिकारी तसेच, राज्याच्या नगरविकास विभागाकडे देखील मार्गदर्शन मागवले होते. मात्र, आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर प्राधिकरणाने पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर सोमवारी (ता. १०) होर्डिंग कारवाईबाबत मागवण्यात आलेल्या निविदा उघडण्यात आल्या. खासगी ठेकेदाराला होर्डिंग कारवाईबाबत कार्यालयाने आदेश दिले आहेत. पीएमआरडीएचे आयुक्त राहुल महिवाल यांची अंतिम स्वाक्षरी झाल्यानंतर होर्डिंग कारवाईची वाट मोकळी होणार आहे. 'पीएमआरडीए'च्या नऊ तालुक्यात टपाटप्प्याने ही कारवाई करण्यात येणार आहे. त्याची सुरवात मुळशी तालुक्यातून होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी या तालुक्यात होर्डिंग कोसळल्याच्या जास्त घटना घडल्या होत्या. त्या अनुषंगाने स्थानिक ग्रामपंचायतीकडून माहिती मागविण्यात आलेली आहे.



"आचारसंहितेमुळे अनधिकृत होर्डिंगवरील कारवाई थांबली होती. आचारसंहितेत निविदा उघडल्या जात नव्हत्या. आता निविदा उघडल्या आहेत. त्यामुळे 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील सर्वच अनधिकृत होर्डिंग हटविण्यात येणार आहे. पुढच्या आठवड्यापासून कारवाईला सुरवात होणार आहे.

\- सचिन म्हस्के, तहसीलदार, आकाशचिन्ह विभाग, पीएमआरडीए.

### परवानगीसाठी केवळ 341 अर्ज

» 'पीएमआरडीए'ने अनधिकृत होर्डिंगधारकांना परवानगीबाबत आवाहन केले होते. त्यानुसार विविध गावातून जवळपास ३४१ अर्ज होर्डिंगची परवानगी मिळावी, यासाठी प्राप्त झाले आहेत. त्यातील सर्वाधिक अर्ज हे मुळशी आणि मावळ तालुक्यातील आहेत. तर, भोर आणि राजगड या तालुक्यातूनदेखील अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे त्याबाबत परवानगीसाठी आयुक्तांकडे अहवाल पाठवण्यात आलेला आहे.

# पालखी सोहळा विसावणार भव्य मांडवात..!

## पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे : आमदार चेतन तुपे

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी वारी पालखी सोहळ्याचे स्वागत आणि विसावा हा हडपसर येथे असतो .या दोन्ही पालखी सोहळात पाणी, शौचालय, वाहतूक व्यवस्था, रस्ते, आरोग्य सुविधा आदी सर्व सोयी सुविधा योग्य पद्धतीने उपलब्ध करून देण्यासह पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असा सूचना आमदार चेतन तुपे पाटील यांनी पोलीस व महापालिका प्रशासनाला दिल्या.तर, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी विसावा ज्याप्रमाणे मंडपात असतो. यंदा संत तुकाराम महाराजांच्या पालखी विसाव्यासाठी तसाच स्वरूपाचा भव्य मंडप विसाव्याशेजारी उभारण्यात येणार असून तेथूनच भाविकांना सुलभ दर्शन देण्याचे नियोजन करावे, असेही आमदार तुपे यांनी प्रशासनाला आवर्जून सुचवले आहे.

दरवर्षी प्रमाणे यंदाही संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याच्या निमित्ताने हडपसर येथील साने गुरुजी भवन येथे पालखी सोहळा स्वागत नियोजन बैठक झाली.यावेळी आमदार चेतन तुपे पाटील, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली माऊली पालखी सोहळ्याचे प्रमुख योगी निरंजन महाराज, जगद्गुरु तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे प्रमुख माणिक मोरे महाराज, संतोष महाराज मोरे, संजय मोरे महाराज, वैशाली बनकर, सुनील बनकर, नंदा लोणकर, सहाय्यक आयुक्त बाळासाहेब ढवळे, सुभाष पावरा , डॉ.दिनेश भेंडे , डॉ.स्नेहल काळे, संजय घनवट , डॉ.शंतनु जगदाळे, मनोज घुले, अमर तुपे ,माऊली कुडले, वैष्णवी सातव,भारती तुपे, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

महापालिका सहाय्यक आयुक्त बाळासाहेब ढवळे यांनी सांगितले की महानगर पालिकेचे विविध विभागांचे ५५ अधिकारी, ८५९ सेवक पालखी सोहळा स्वागतापासून ते सोहळा महापालिका हद्दी बाहेर मार्गस्थ होईपर्यंत नेमून दिलेली काम करणार आहेत.४४ ठिकाणी २७० मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करण्यात येत आहे. याशिवाय रस्त्याच्या बाजूला कचऱ्याचे कंटेनर ,निर्माल्य कलश आणि २० घंटा गाडी ठेवण्यात येणार आहेत.आरोग्य विभागाच्या वतीने परिसरात औषध फवारणी केली जाणार आहे. पालखी सोहळा दरम्यान हडपसर मधील २८ खासगी रुग्णालयात वारकऱ्यांना मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय २१ अम्ब्युलन्स ठेवण्यात येणार आहेत. पालखी रथाला तसेच धोकादायक असणाऱ्या झाडांच्या फांद्या काढणे आणि रस्ते व पदपथावर असलेले अतिक्रमण काढण्यात येणार आहे.



### अन्नप्रसाद व फराळाचे वाटप करण्यापेक्षा देशी वृक्षांची लागवड करा

» माणिक महाराज मोरे म्हणाले की पालखी मार्गावर वारकऱ्यांना फराळाचे वाटप करण्यापेक्षा आपण देशी वृक्षाची लागवड केली तर, वारकऱ्यांना चिरंतर सावली मिळण्यास मोठी मदत होणार आहे. त्यामुळे अन्नप्रसाद वाटप करण्यापेक्षाही आपण वृक्षारोपण करावे ,तसेच प्लास्टिक मुक्तवारी करावी. कोणा भाविकाला अन्नप्रसाद किंवा फराळाचे वाटप करायचे झाले. तर प्रत्येक दिंडीचा जे कोणी विणेकरी असेल त्या विनेकाऱ्याकडे त्याचे वाटप करावे जेणेकरून विसाव्याच्या ठिकाणी दिंडीतील सर्व वारेकऱ्यांना ते मिळू शकेल.

### पुरेसा रस्ता उपलब्ध करून द्या

» मगरपट्टा उड्डाणपूल ते गाडीतळ विसावा व त्यापुढेही वारकऱ्यांच्या दिंड्या चालण्यासाठी येथील भाविक अतिशय कमी जागा ठेवतात त्यामुळे दिंड्यांना अगदी सावकाश चालावे लागते .त्यामुळे विसाव्याच्या ठिकाणी जास्त वेळ थांबता येत नाही. भाविकांनी व प्रशासनाने मोठा रस्ता उपलब्ध करून दिला .तर, विसाव्याच्या ठिकाणी अर्धा तास जास्तीचा विसावा देऊन भाविकांना दर्शन उपलब्ध करून देता येईल, असे भानुदास महाराज मोरे यांनी सांगितले.

# समाधानकारक पाऊस असल्याने यंदा खरिपाचा पेरा वाढणार!

## पुरंदर तालुका कृषी विभागाचा अंदाज : पुरंदर तालुक्यात काही भागात पेरण्या सुरु

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात गत वर्षी समाधानकारक व पेरणी योग्य पाऊस झाला नसल्याने पेरणी अत्यंत कमी क्षेत्रावर करण्यात आली होती; परंतु हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुरंदर तालुक्यात यंदा चांगला व समाधानकारक पाऊस होणार असल्याने तालुक्यात यंदा खरीप पेरणी क्षेत्र वाढणार असल्याचा अंदाज पुरंदर कृषी विभागाने वर्तविला आहे.

खरीप हंगामामध्ये तालुक्यात भात, बाजरी, वाटाणा, भुईमूग, सोयाबीन, कांदा यांची पेरणी तर टोमॅटो, पालेभाज्या, फळभाज्या व आडसाली ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. दिवे, जेजुरी, सासवड, वीर, वाल्हा, गराडे परिसरात मोठ्या प्रमाणात पेरण्या सुरू झाल्या आहेत तर काही ठिकाणी पेरणी पूर्व मशागती पूणर्र् झाल्या आहेत.

तर अद्याप काही भागात पावसाचे प्रमाण कमी असल्याने पेरणीस घाई न करण्याचा सल्ला कृषी अभ्यासकांनी दिला आहे.तालुक्यात खरीप हंगाम हा महत्त्वाचा हंगाम मानला जातो. खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात उलाढाली शेतकरी करतात. तर यंदा पेरणी क्षेत्र वाढणार असल्याचा अंदाज असल्याने कृषी व्यवस्थेवर अवलंबुन असणारे सर्व उद्योग व्यवसाय समाधानाच्या आशेवर आहेत.

ज्यांची पेरणीसाठी जमीन आहे अशा बळीराजाने वटाण्याचे पीक लवकर यावे व बाजार चांगलाबाजार भाव मिळावा यासाठी पेरण्याची घाई करून आपापली पेरणी करण्यासाठी लगबग करतांना दिसत आहे. पुरंदरचा शेतकरी शेतात मशागत व पेरणी करीत आहेत. सुरुवातीच्या वाटण्यास बाजारभाव चांगला मिळत असल्याने प्रत्येक शेतकरी पेरणीची लागबग करतो आहे.



“ चालू वर्षात चांगले पाऊसमान सांगितले असलेने व जुन महिन्याच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाल्याने यंदा खरीप पेरा वाढण्याची शक्यता आहे व त्या अनुषंगाने सर्व आवश्यक तयारी कृषी विभागाने क्षेत्रीयस्तरावर पूर्ण केलेली आहे.

\- सुरज जाधव, कृषी अधिकारी, पुरंदर तालुका

### 80 मिमी पाऊस झाल्या नंतरच पेरणी करा

» तालुक्यात 71.9 टक्के म्हणजेच सरासरी 80.7 मिमी पाऊस झाला आहे; परंतु तालुक्यातील सासवड, कुंभारवळण आणि राजेवाडी मंडलमध्येच पेरणी योग्य पाऊस झाला आहे. त्यामुळे 80 मिमी पाऊस झाल्यानंतरच पेरणी करण्याचा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.